



वेळ रात्रीची साधारणतः ११वा ( पोलीस स्टेशन, कोठारी जिल्हा चंद्रपुर )

एक वयोवृद्ध इसम मौजा पळसगाव शिवारात चिखलात पडून असल्याबाबत माहिती पोलिसांना मिळते, पोलिस क्षणाचाही विलंब न करता मौजा शेतशिवाराकडे धाव घेतात रात्रीचि वेळ ..अमावसेची रात्र काळाकुट्ट अंधार..वरतून पावसाची रिपरिप ...वयोवृद्ध इसम.. चिखलात पडून..शेतशिवारात कोण असेल ? कोणी आणून तर नसेल ना टाकले? असे अनेक प्रश्न पोलिसांच्या समोर उभे असतानाच पोलिस स्टेशन कोठारीचे ठाणेदारअंबिके व पोलिस सारथी स्टाफ त्याठिकाणी पोहचतात तेथून आत मध्ये शेतशिवाराचा रस्ता असल्याने पावसामुळे चिखल झाला होता वाहन तर जाणे शक्य नव्हते शिवाय चिखलाच्या रस्ता ..जंगली श्वापदाची भिती, किर्र अंधार तरीसुद्धा तातडीने घटनास्थळी जाऊन शेतशिवारात शोध घेतला पाहतात तर काय एक वयोवृद्ध इसम वय अंदाजे ७० वर्षे चिखलात पडून दिसला थंडीने कुडकुडत होता सुदैवाने तो जिवंत असल्याची खात्री झाली पोलिसांनी सुटकेचा निःश्वास टाकला अधिक वेळ न दवडता त्या वयोवृद्ध इसमास तातडीने वैद्यकीय तपासणी व उपचार कामी हॉस्पिटल ला नेले श

वैद्यकीय उपचारानंतर डाॅक्टरानी घेऊन जाण्यास सांगितले विचारपूस केली असता नाव लक्ष्मण दशरथ भाजीपाले रा पुजा वॉर्ड क्र ३ ब्रम्हपूरी असे सांगितले

त्या इसमास पोलिसांनी स्वच्छ गरम पाण्याने अंघोळ घालून कोरडे कपडे, चप्पल घालण्यास दिले ,जेवण दिले.

याबाबत अधिक तपास केला असता सदर इसम  हरविल्याबाबत तक्रार पोलिस स्टेशन ब्रम्हपूरी येथे मिसिंग क्रमांक ६१/२०१९असल्याचे तपासाअंती निष्पन्न झाल्याने

त्यांचा मुलगा रविंद्र लक्ष्मण भाजीपाले यांना फोनवर संपर्क साधून शहानिशा केली असता ,सदर इसम त्यांचे वडील असल्याबाबत सांगितले वरून त्यांना त्यांचे घरी पुजा वॉर्ड क्र ३ ब्रम्हपूरी येथे खात्री करून, त्यांचे मुलाचे ताब्यात दिले.

कुटुंबियांनी पोलिस अधीक्षक व कोठारी पोलिस सारथी टीमचे आभार मानले